जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट दिनांक १३.०१.२०२५

# ''दोन दिवसापुर्वी झालेल्या खुनाच्या गुन्हयातील आरोपीस शिताफीने अटक''

दिनांक. ११/०१/२०२५ रोजी बदलापूर पूर्व पोलीस ठाणे येथे अकस्मात मृत्यू रजि. नं. ०६/२०२५, भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम १९४ प्रमाणे दाखल होता. सदर अ.प.मृत्युचा प्राथमिक तपास मपोउपनि/अनु शर्मा या करित असल्याने त्यांनी सदर गुन्हयातील अकस्मात मृत्यूची खबर देणारे नरेश शंभु भगत, वय-३० वर्षे, यांना चौकशी करणेकामी पुन्हा पोलीस ठाण्यात बोलाविले असता त्याने संशयास्पदरितीने व उडवाउडवीची उत्तरे दिली म्हणुन त्याची अधिक कसुन चौकशी केली असता त्याने माहिती दिली की, मयत सुकांत शतृघ्न परिडा वय २९ वर्षे हा त्याचे घरी येवुन त्याच्या पत्नीस जबरदस्ती करायचा तसे पत्नीने वारंवार सांगितले होते. त्यावरून त्यांच्यात भांडणे देखील होत असत मयत हा फिर्यादीच्या पत्नीस जबरदस्ती करायचा या गोष्टीचा फिर्यादी यास भयंकर राग आल्याने दिनांक १०/०१/२०२५ रोजी ते दिनांक ११/०१/२०२५ रोजीचे दरम्यान शिरगांव, एमआयडीसी बदलापूर पूर्व येथे स्वताच्या घरी मयत सुकांत शतृघ्न परिडा याचे डोक्यावर लोखंडी हातोडी व सळईने वार करून त्यास जिवे ठार मारले आहे असे सांगितले.

सदर घटने बाबत अकस्मात मृत्यू रजि. नं. ०६/२०२५ मधील खबर देणारा आरोपी नरेश शंभु भगत, वय-३० वर्षे, यानेच सदर गुन्हयातील मयत इसम सुकांत शतृघ्न परिडा याचा खुन केला असल्याची कबूली दिल्याने त्याचे विरुध्द बदलापूर पूर्व पोलीस ठाणे येथे गु.र.नं १७/२०२५, भारतीय न्याय संहिता सन २०२३ कलम १०३ प्रमाणे दाखल करण्यात आला असून त्यास अटक करण्यात आली आहे.

सदरचा गुन्हा श्री.सचिन गोरे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ४ उल्हासनगर, श्री. शैलेश काळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंबरनाथ विभाग, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.किरण बालवडकर यांच्या मार्गदर्शनाखाली मपोउपनि/अनु शर्मा यांनी अत्यंत कुशलतेने उघडकीस आणला असून गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.किरण बालवडकर हे करीत आहेत.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर